ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
Janury-June 2024- Vol. 13 No. 1

# अहमदनगर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात अग्रणी बँकेयोजनेचे योगदान

प्रा.आनंद हिरामन घोंगडे
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग
बाबुजी आव्हाड महाविद्यालयं,पाथर्डी

**प्रस्तावना:-**

*महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा उगम आणि विकासाचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक अहमदनगर जिल्ह्याची अर्थव्यवस्था मुख्यतः कृषीवर आधारित आहे अहमदनगर जिल्ह्यातील गोदावरी,मुळा, प्रवरा,सीना इत्यादी नद्या वाहत असल्यामुळे हा जिल्हा कृषी क्षेत्रात अधिक विकसित जिल्हा म्हणून ओळखला जातो.उसा सारख्या नगदी पिकाच्या बरोबरच फळबाग,भाजीपाला,साखर कारखान्यामुळे या जिल्ह्यात विकासाला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. अग्रणी बँक योजनांचा अहमदनगर जिल्ह्याच्या विकासामध्ये मोठा वाटा आहे. जिल्ह्याच्या विकासामध्ये कृषी कर्ज पुरवठा, लघुउद्योग कर्ज पुरवठा, नाबार्ड अंतर्गत विकासात्मक योजनासाठी ही बँक वरदान ठरली आहे.याशिवाय या बँकेमुळे अहमदनगर जिल्ह्यातील कृषी व उद्योग सहकार क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास रोजगार निर्मिती आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यास या बँकेची मदत झाली आहे.अशा परिस्थितीत अहमदनगर जिल्ह्याच्या विकासात अग्रणी बँकेचा अभ्यास करण्यासाठीचे विश्लेषणात्मक अध्ययन आवश्यक ठरते. म्हणून त्यादृष्टीने क्षेत्रफळाच्या बाबतीत सर्वात मोठ्या असणाऱ्या अहमदनगर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात अग्रणी बँक योजनेच्या योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठीशोधनिबंधातया विषयाची निवड केलेली आहे.*

जिल्ह्याच्या विकासामध्ये सहकारी चळवळीचा वाटा मोठा असला तरी इतर सेवा क्षेत्राचाही सहभाग आहे.त्यामध्ये बँक क्षेत्र अतिशय महत्त्वाचे कारण या जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती, दुग्ध व्यवसाय, फळभाज्या हाच प्रामुख्याने राहिला आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार एकूण 1553 खेडी असलेल्या या जिल्ह्यात 14 तालुके आहेत.या 14 तालुक्यांपैकी संगमनेर, राहुरी, श्रीरामपूर, कोपरगाव इत्यादी तालुक्यांचा कृषी विकासात मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. या तालुक्यामध्ये ऊस, फळबाग, भाजीपाला याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते.तरी या तुलनेत पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड, पारनेर या तालुक्यात जलसिंचनाची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे कृषी क्षेत्राचा व औद्योगिक क्षेत्राचा फारसा विकास झालेला नाही. अहमदनगर जिल्ह्यात सन 2001-02 च्या वार्षिक अहवालानुसार वाणिज्य बँकांची संख्या 214 होती आशिया खंडात सहकार क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे संख्या व इतर प्राथमिक भूविकास बँकांच्या 425 शाखा कार्यरत होत्या.अशा एकूण 639 बँकांची संख्या ही शहरी व ग्रामीण भागात असून सन 2010-11 मध्ये या शाखाचा विस्तार मोठ्या प्रमाणात घडून आला.बँकांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झालेल्या अहमदनगर जिल्ह्याच्या विकासात अग्रणी बँकांचा वाटा निश्चितच मोठ्या प्रमाणात दिसून येतो.त्याचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट्ये :-**

१. भारतातील लीड बँक योजनेचा अभ्यास करणे.
२. अहमदनगर जिल्ह्याच्या लीड बँकयोजनेचा अभ्यास करणे.
३. अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्याग्रामीण विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची व्याप्ती:-**

अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा असल्याने हा अभ्यास प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँक योजनेपुरता मर्यादित आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँक योजना म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही कार्यरत आहे.आणि म्हणून हा अभ्यास अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्या ग्रामीण विकासातील योगदानाचे विश्लेषण करतो.

**अग्रणी बँक योजना आणि अहमदनगर जिल्हा :-**

अहमदनगर जिल्ह्याचा महाराष्ट्रात भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रथम क्रमांक लागतो. जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थिती अतिशय वैविध्य आहे. अहमदनगर जिल्ह्यात एकूण 14 तालुके आहेत सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही राष्ट्रीयकृत व्यापारी बँक अहमदनगर जिल्ह्याची "अग्रणी

बँक" आहे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या संपूर्ण भारतात एकूण 4100 शाखा कार्यरत आहे याशिवाय 1300 उपशाखामार्फत ही बँक आपल्या सेवा पुरवत आहे. ग्रामीण भागातील लोकांना बँकेच्या सेवा पुरविण्यात यावा यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाने भारतात सुमारे 3750 बँकिंग प्रतिनिधीची नेमणूक केली आहे. राष्ट्रीयकृत बँकांची सेवा उपलब्ध नसलेल्या खेड्यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाने विशेष मोहीम राबवून सुमारे 35 लाख लोकांपर्यंत बँकिंग सुविधा पोहोचण्याचे मोठे कार्य केले आहे.या बँकेमार्फत नाबार्ड आणि रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून अहमदनगर जिल्ह्यात अग्रणी बँक योजना राबवली जाते.या बँकेमार्फत अहमदनगर जिल्ह्यासाठी संवितरित करावयाच्या कर्जाचे नियोजन केले जाते.कर्ज संवितरणात जिल्ह्यातील सर्व व्यापारी बँका व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सहभागी होतात सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहमदनगर जिल्ह्यासाठी जिल्हा पत धोरण (district credit plan) आणि वार्षिक पत धोरण (annual credit plan) तयार करते. हे पत धोरण सर्वसमावेशक स्वरूपाचे त्यात जिल्ह्यातील सर्व बँकांसाठी तालुका निहाय,क्षेत्रनिहाय,योजना निहाय आणि बँक निहाय कर्ज पुरवठ्याची लक्ष निर्धारित केली जातात.बँक शाखा पासून ते जिल्हा पत नियोजनाच्या सर्व बाबी लाभार्थी तयार केलेल्या (Potential linked Credit plan-PLP वर आधारित असतात. हा छ्रू तयार करताना नाबार्ड कडूनजिल्ह्यातील विकास कार्यक्रम आणि शासनाच्या धोरणातील बदल विचारात घेतले जातात.अग्रणी बँक योजनेत अहमदनगर जिल्ह्यासाठी वार्षिक पत आराखडा तयार करण्याचे काम सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक करतात.हा आराखडा तयार करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व समन्वय समिती, जिल्हा परिषद अधिकारी, अहमदनगर मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई अग्रणी बँक अधिकारी,नाबार्डचे महाप्रबंधक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक, राज्यस्तरीय बँकिंग समिती,शासकीय अनुदान देणाऱ्या कार्यालयाची सर्व जिल्हा प्रतिनिधी आणि सर्व बँकांचे पदाधिकारी याची मार्गदर्शन आणि सहकार्य घेतले जाते.या आराखड्याची अंमलबजावणी अग्रणी बँकेच्या उद्दिष्टांना अनुसरून करण्याचा प्रयत्न सेंट्रल बँक ऑफ इंडियाही अहमदनगर जिल्ह्याची अग्रणी बँक करते.

**अग्रणी बँक योजनेचे स्वरूप** :-

रिझर्व बँक ऑफ इंडियाने ग्रामीण पतपुरवठ्याचा क्षेत्रीयदृष्टिकोन स्वीकारून अग्रणी बँक योजनेची आखणी केली.सुरुवातीला देशातील 335 जिल्ह्यामध्ये ही योजना सुरू करण्यात आली.हे 335 जिल्हे स्टेट बँक ऑफ इंडिया व तिच्या सहयोगी बँक,राष्ट्रीयकृत बँका व 3 खाजगी बँका मध्ये वाटून देण्यात आले.मात्र मुंबई, कलकत्ता,मद्रास ही महानगरी आणि दिल्ली,पॉंडिचेरी व गोवा हे केंद्रशासित प्रदेश यांनाही योजना लागू करण्यात आली नव्हती.या योजनेत एक जिल्हा एका बँकेला दत्तक म्हणून देण्यात आला.या बँकेला त्या जिल्ह्याची अग्रणी बँक म्हणून दर्जा देण्यात आला. असा दर्जा मिळाल्यानंतर अग्रणी बँकेने त्या जिल्ह्याच्या विकासासाठी प्रथम पुढाकार घ्यावा तसे जिल्ह्याचे पत धोरण तयार करून संपूर्ण जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करावा ही जबाबदारी अग्रणी बँकेवर टाकण्यात आली.आज अग्रणी बँक योजना ही देशांच्या 625 पेक्षा जास्त जिल्ह्यांत कार्यरत आहे.

**महाराष्ट्रातील अग्रणी बँका आणि जिल्हे यांची स्थिती (मार्च 2009,)**

**महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय अग्रणी बँका दर्शविण्यात आल्या आहेत.**

| अनु.क्र | अग्रणी बँका | जिल्हयांचे नावे |
|---|---|---|
| 1 | बँक ऑफ इंडिया | भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, कोल्हापूर, नागपूर, रायगड, रत्नागिरी, सांगली, सिंधुदुर्ग, सोलापूर, वर्धा आणि गोंदिया |
| 2 | स्टेट बँक ऑफ इंडिया | परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, उस्मानाबाद वाशिम, नंदुरबार आणि मुंबई |
| 3 | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | अहमदनगर, अकोला, अमरावती, बुलढाणा, धुळे जळगाव आणि यवतमाळ |
| 4 | बँक ऑफ महाराष्ट्र | औरंगाबाद, जालना, नाशिक, पुणे, सातारा आणि ठाणे |

(स्त्रोत-Reserve Bank of Indiareport of the high level committee of reviewleads Bank scheme-2009)

वरील तक्ता-१ भारताच्या ग्रामीण क्षेत्राच्या विकासात अग्रणी बँकेच्या कार्यास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. वरील अग्रणी बँकेच्या सुचीवरून स्पष्ट होते की,महाराष्ट्र व अहमदनगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अग्रणी बँक प्रभावीपणे कार्य करीत आहे.अग्रणी बँकेकडे सोपविण्यात आलेल्या जिल्ह्याच्या पत विषयी गरजा पूर्ण होतील अशा प्रकारे राशी व पतपुरवठा यातील अंतर कमी होण्यास मदत होईल.

अग्रणी बँक योजनेअंतर्गत मार्च 2009 अखेर महाराष्ट्र राज्यातील 33 जिल्ह्याची जबाबदारी विविध व्यापारी बँकांनी अग्री बँक म्हणून स्वीकारले होती. सर्वाधिक अग्रणी बँकांमध्ये बँक ऑफ इंडिया असून या बँकेने एकूण 12 जिल्ह्याचे नेतृत्व केले आहे. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाचा क्रमांक लागतो या बँकेने एकूण 8 जिल्ह्यांमध्ये अग्रणी बँक म्हणून नेतृत्व केले आहे. त्यानंतर अहमदनगर, अकोला, अमरावती, बुलढाणा, धुळे, जळगाव आणि यवतमाळ या 7 जिल्ह्यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाने अग्रणी बँक म्हणून नेतृत्व केले आहे.तर बँक ऑफ महाराष्ट्र एकूण 6 जिल्ह्यांमध्ये अग्रणी बँक म्हणून नेतृत्व केले.असून या जिल्ह्यामध्ये औरंगाबाद, जालना, नाशिक,पुणे,सातारा आणि ठाणे या जिल्ह्याचा समावेश होतो.

**अहमदनगर जिल्ह्यात अग्रणी बँक योजनेच्या शाखा:-**

अहमदनगर जिल्ह्यात अग्रणी बँक सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही कार्यकरते. या अग्रणी बँकेच्या नागरी,अर्धनागरी आणि ग्रामीण भाग म्हणून एकूण 62 शाखा कार्यरत आहेत.

अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्या नागरी,अर्धनागरी आणि ग्रामीण भागातील शाखानिहाय संख्या-(सन 2010-11)

**जिल्हातील तालुकानिहाय अग्रणी बँका दर्शविण्यात आल्या आहेत.**

| अ.क्र | बँकांचे नाव | शहरी/ नागरी | अर्धशहरी | ग्रामीण | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 2 | 1 | 4 | 7 |
| 2 | अकोले | - | 1 | 5 | 7 |
| 3 | जामखेड | - | 1 | 2 | 3 |
| 4 | कर्जत | - | 1 | 2 | 2 |
| 5 | कोपरगाव | - | - | 1 | 2 |
| 6 | नेवासा | - | 1 | 1 | 2 |
| 7 | पारनेर | - | 1 | 6 | 7 |
| 8 | पाथर्डी | - | 1 | 3 | 4 |
| 9 | राहुरी | - | 1 | 3 | 4 |
| 10 | संगमनेर | - | 1 | 5 | 6 |
| 11 | शेवगाव | - | 1 | 2 | 3 |
| 12 | श्रीगोंदा | -- | 1 | 7 | 8 |
| 13 | श्रीरामपूर | - | 1 | 2 | 3 |
| 14 | राहता | - | 1 | 2 | 4 |
| | | **2** | **14** | **45** | **62** |

(स्त्रोत:-वार्षिक ऋण योजना २०१०-११ सेंट्रल बँक ऑफ इंडिया अग्रणी बँक अहमदनगर)

वरील तक्त्या-2 मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्या तालुका निहाय शहरी,अर्धशहरी,ग्रामीण शाखा दर्शविल्या आहेत. सन 2010-11 मध्ये अहमदनगर जिल्ह्यात अग्रणी बँकेच्या एकूण 62 शाखा आहेत. त्यापैकी शहरी भागात 2 शाखा अर्धशहरी भागात 14 शाखा आणि ग्रामीण भागात सर्वात जास्त 45 शाखा कार्यरत आहेत.

निष्कर्ष :-

अहमदनगर जिल्ह्यामध्ये अग्रणी बँक योजना राबविण्याची मुख्य जबाबदारी ही सेंट्रल बँक ऑफ इंडियाची आहे. तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात अग्रणी बँक योजना ही विविध राष्ट्रीयकरण बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येते. एकूणच महाराष्ट्रामध्ये अग्रणी बँक योजना ही इतर वित्तीय संस्था विकास संस्था आणि शासकीय यंत्रणा यात चांगला ताळमेळ बसल्याने ही योजना मोठ्या प्रमाणावर यशस्वी

झाल्याची दिसते. अग्रणी बँकद्वारे रोजगार निर्मिती कार्यक्रम,एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, सवलतीच्या व्याजदराची योजना, सुशिक्षितांसाठीच्या योजना चांगल्या प्रकारे राबवल्या जातात. महाराष्ट्रात जिल्हा पातळीवर तसेच पंचायत समिती पातळीवर समन्वय समिती अतिशय उत्कृष्ट कार्य करीत आहेत. यावरून लक्षात येते की, संपूर्ण देशात व राज्यात अग्रणी बँक आपले अधिकोष व्यवहाराचे जाळे एका विशिष्ट बँके मार्फत राबवत नाही तर अनेक बँकांच्या माध्यमातून- परस्पराशी एकमेकांशी संबंध निर्माण होतो असे दिसते. भारताच्या ग्रामीण विकास करण्याच्या दृष्टीने स्थापन झालेल्या अग्रणी बँक योजनेचे विकसित बँकांना एक सक्षम नेतृत्व प्रदान केले असले तरी वित्तीय पुरवठा आणि काही इतर आर्थिक मर्यादामुळे या योजनेचे यश मापक स्वरूपातच राहिले. असे असले तरी या योजनेला अजूनही खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे. भारतातील ग्रामीण भागाच्या आणि कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने अग्रणी बँक योजना ही एक अत्यंत उपयुक्त योजना असून या योजनेच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया, केंद्र सरकार, नाबार्ड, राज्य सरकारे, व्यापारी व सहकारी बँका आणि बँकिंग सुविधाचा लाभ घेणारे लाभधारक यांनी एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे झाल्यास भारतीय शेतीचा,ग्रामीण भागाचा व पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेचा वेगाने विकास घडविण्यास मदत होईल. म्हणून जिल्ह्याच्या विकासामध्ये आणि पायाभूत सुविधाच्या विकासामध्ये अग्रणी बँकेची भूमिका महत्त्वाची आहे

**संदर्भसूची :-**


- तळेकर डॉ.शंकर आणि जहावर प्रा.काबरा- भारतीय बँकिंग व्यवस्था –चिन्मय प्रकाशन औरंगाबाद ,प्रथमा आ. 2005 पृष्ट क्रं-75
- डॉ.देसाईस श्री. आणि डॉ. दास्ताने संतोष- भारतातील ग्रामीण बँक व्यवसाय, निराळी प्रकाशन,पुणे द्वितीय आवृत्ती-1991
- अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया (अग्रणी बँक) यांनी दिलेल्या माहिती नुसार
- सराफ प्रा. मोहन आणि आचार्य प्रा. ना. मा: बँकिंगची तत्वे व ग्रामीण विकास –चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद, जून 1991
- Uday Kumar Lal Das-Bank Reform and lead Bank Scheme-Deep and deep Publication, New Delhi-2002 P. No 104 to 105
- Reserve Bank of India, (August 2009), Report of the High LevelCommittee to Review Lead Bank Scheme.